**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविण्यात येणारे दुग्धतंत्रज्ञान, मत्स्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम, डॉ बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठामार्फत चालविण्यात येणारे मत्स्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम व महात्मा फुले कृषि विद्यापीठामार्फत चालविण्यात येणारे पशुसंवर्धन पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता सामायिक प्रवेश परीक्षा (CET) लागू करण्याबाबत...**

# महाराष्ट्र शासन

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**शासन निर्णय क्रमांक : मपवि २०१७ / प्र.क्र. ५७ / म्हापसू**

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- २३ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र. मपवि २०१७/प्र. क्र. ५७/म्हापसू, दिनांक ९ ऑगस्ट, २०१७

२) अधिसुचना, विधी व न्याय विभाग क्र २८, दिनांक १७ ऑगस्ट, २०१५

३) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे क्र मकृप/शिक्षण -१/प्र.क्र. ५६१६/२०० अ/२०१८, दिनांक २३ जानेवारी २०१८ चे पत्र.

४) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे क्र मपमविवि/ विद्या/ पप /२५९/५४७१/२०१८, दिनांक ०५ फेब्रुवारी २०१८ चे पत्र

५) अधिसुचना, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग समक्रमांक, दिनांक: २३ फेब्रुवारी, २०१८

**<u>प्रस्तावना :</u>**

महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८), अंतर्गत, बी.टेक (डी.टी.) / बी.एफ.एस्सी / बी.एस्सी.( ऑनर्स ) पशुसंवर्धन या अभ्यासक्रमास संदर्भ क्र ५ येथील दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ च्या अधिसूनेन्वये "व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम" म्हणून घोषित व अधिसूचित करण्यात आले आहे.

राज्यातील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ व कृषी विद्यापीठाकडून मान्यताप्राप्त व संलग्नता प्राप्त असलेल्या कायम विनाअनुदानित खाजगी महाविद्यालयांमधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परिक्षा आणि प्रवेश प्रक्रिया याबाबतची कार्यवाही उक्त अधिनियमाच्या कलम २३ अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतूदीनुसार आयुक्त, सामायिक प्रवेश परिक्षा तथा सक्षम प्राधिकारी यांच्याकडून करण्यात येणार आहे. तथापि, राज्यातील शासन मान्यता प्राप्त व विद्यापीठांतर्गतचे घटक (शासकीय) महाविद्यालयांमधील उक्त नमूद व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परिक्षा आणि प्रवेश प्रक्रिया याबाबत कोणती कार्यवाही अवलंबिण्यात यावी, याबाबत स्पष्टता नसल्याने, ही

सुस्पष्टता व एकवाक्यता आणण्याच्या दृष्टीने राज्यातील शासन मान्यता प्राप्त व संदर्भाधीन क्र ५ येथील दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ च्या अधिसूचनेन्वये घोषित व अधिसूचित करण्यात आलेल्या व्यावसायीक शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परिक्षा आणि प्रवेश प्रक्रिया उक्त अधिनियमाच्या कलम २३ अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतूदीनुसार आयुक्त, सामायिक प्रवेश परिक्षा तथा सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावरुन राबविण्यात यावी, असा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. तरी, सर्व सबंधितांनी अधिनियमातील तरतुदीनुसार आणि शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशानुसार पुढील कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२३१७१७४८८८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीन साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kiran V Kurundkar

Digitally signed by Kiran V Kurundkar
DN: c=IN, o=All India Services, ou=MSRDC Ltd, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f89b7a82db2238fb7337a9a9b8e00b9c1a35b509d1f6850ddcc783bdb12090f, serialNumber=b8691b27012359b3df3a439ebd4db94d6888054fe73fc8f7a75c05e1ec845136, cn=Kiran V Kurundkar
Date: 2018.03.01 11:16:21 +05'30'

**( किरण कुरुंदकर )**

शासनाचे सचिव

**प्रत,**

१. मा.राज्यपाल-नि-कुलपती यांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

३. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

४. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे

५. आयुक्त, कृषी/ पशुसंवर्धन/ मत्स्यव्यवसाय/दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य

६. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

७. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

८. आयुक्त, सामायिक प्रवेश परिक्षा (CET) तथा सक्षम प्राधिकारी, ३०५, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक बिल्डिंग, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा-पूर्व, मुंबई-५१.

९. कुलगुरु/ कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

१०. कुलगुरु / कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि रत्नागीरी

११. कुलगुरु / कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर

१२. सह सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

१३. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपुर,

१४. निवड नस्ती, माफसु, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.